# सन १९५३ चा मुंबई अधिनियम, क्रमांक २९*

[मुंबई निर्वासित हितसंबंध (विभागणी) अधिनियमाच्या उपबंधांचें वैधकरण करणें व त्यांत अनुपूरक उपबंध दाखल करणे याबाबत अधिनियम, १९५३]

[१४ मे १९५३]

**निर्वासित हितसंबंध (विभागणी) अधिनियम, १९५१, मुंबई राज्यास लागू करतांना त्याच्या विवक्षित उपबंधांचें वैधकरण करणें व त्यांत अनुपूरक उपबंध दाखल करणें याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी निर्वासित हितसंबंध (विभागणी) अधिनियम, १९५१, मुंबई राज्यास लागू करतांना त्याच्या विवक्षित उपबंधांचें वैधकरण करणें व त्यांत अनुपूरक उपबंध दाखल करणें इष्ट आहे ; त्याअर्थी याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. ह्या अधिनियमास मुंबई निर्वासित हितसंबंध (विभागणी) अधिनियमाच्या उपबंधांचें वैधकरण करणें व त्यांत अनुपूरक उपबंध दाखल करणें याबाबत अधिनियम, १९५३, असें म्हणावें. लघु संज्ञा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो सबंध मुंबई राज्यास लागू आहे.

(३) तो ताबडतोब अंमलांत येईल.

२. (अ) निर्वासित हितसंबंध (विभागणी) अधिनियम, १९५१, याचे उपबंध भारताच्या संविधानाच्या सप्तम अनुसूचींतील सूचि २ यात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि बाबींशी त्यांचा जेथवर संबंध असेल तेथवर, तारीख १५ माहे डिसेंबर १९५२ पासून, जणूं ते उपरिनिर्दिष्ट कोणत्याहि अशा बाबीसंबंधानें राज्य विधान मंडळानें केलेल्या अधिनियमांत दाखल केले होते असें समजून, सर्व कारणांसाठीं नेहमी वैध व परिणामक्षम होते असें समजलें पाहिजे ; आणि सन १९५१ चा अधिनियम ४४ यांत विवक्षित उपबंध दाखल करणें व त्याच्या विवक्षित उपबंधांचें वैधकरण करणें.

(ब) उपरिनिर्दिष्ट तारखेस व त्यानंतर कोणत्याहि सक्षम प्राधिकाऱ्यानें उक्त अधिनियमाअन्वयें जो कोणताहि आदेश दिला असेल किंवा जी कोणतीहि उपाययोजना केली असेल किंवा उक्त अधिनियमाअन्वयें जें कोणतहि कृत्य योग्य रीतीनें करण्यांत आलें असेल त्याचा उपरिनिर्दिष्ट कोणत्याहि अशा बाबींशी जेथवर संबंध असेल तेथवर पुढील मुद्यावर त्यासंबंधीं कोणताहि आक्षेप घेतां कामा नये म्हणजे असा आदेश उपाययोजना किंवा कृत्य उपरिनिर्दिष्ट कोणत्याहि बाबीसंबंधानें संसद विधि करण्यास सक्षम नव्हती याकारणामुळें अवैध व परिणामशून्य आहे याच केवळ मुद्यावर त्यासंबंधीं आक्षेप घेतां कामा नये.

---

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.